# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - १२४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५

## प्रेस नोट

**"आलिशान चार चाकी वाहन चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करुन ५९,००,०००/- रुपये किंमतीच्या ०५ चार चाकी वाहने जप्त करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश".!!"**

दिनांक ०५/०३/२०२५ रोजी ०८.०० वा. ते ०६/०३/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे सौ. मनिषा शांतीलाल जैन, वय-४५, धंदा-नोकरी, रा. ७०४/बी, विशाल अपार्टमेन्ट भाईंदर (प) यांनी त्यांचे कडे असलेली १५,००,०००/- रु. किंमतीची महिंद्रा कंपनीची थार कार क्रमांक- एमएच-०२-एफआर-७८८४ हि इमारतीचे पार्किंग मध्ये पार्क करुन ठेवली असता ती अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमती शिवाय, लबाडीचे इरादयाने चोरी करुन घेवून गेला असलेबाबत फिर्यादी यांनी भाईंदर पोलीस ठाणे ५७/२०२५, बी.एन.एस.कलम ३०३(२) प्रमाणे दिनांक ०७/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल आहे.

वरील नमुद गुन्हयाचा समांतर तपास करतांना गुन्हयाचे घटनास्थळाचे व परिसरातील सीसीटिव्ही फुटेजची पडताळणी करुन, मिळालेली गुप्त माहिती व तांत्रीक विश्लेषना वरुन आरोपीत हा जिल्हा बक्सर, राज्य-बिहार येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ सदर ठिकाणी पोलीस पथक रवाना करुन आरोपीत नामे १) अभिषेक अरविंद सिंग, वय-२५, रा. मु.पो. मंजरीचा, ता. बक्सर सदर, जि.बक्सर, राज्य-बिहार यास ताब्यात घेवून त्याचे कडुन खालील प्रमाणे ०५ वाहाने जप्त केली.

| अक्र | किंमत | वाहनाचा प्रकार | वाहनावरील खोटा क्रमांक | पडताळीअंती वाहनाचा खरा क्रमांक | दाखल गुन्हे |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५,००,०००/- | महिंद्रा थार | MH-०३-EV६७८६ | MH-०२-FR-७८८४ | भाईंदर पोलीस ठाणे ५७/२०२५, बी.एन.एस.कलम ३०३(२)मधील चोरी गेलेली. |
| २ | २०,००,०००/- | टोयाटो फॉच्युनर | MH-०२-FJ-४६९८ | MH-०२-FR-७६०३ | खेरवाडी पोलीस ठाणे ७३/२०२४, भादंवि ३७९ मधील चोरी गेलेली. |
| ३ | ५,००,०००/- | होंन्डा ॲमेझ | MH-४७-AG-१२६० | MH-४७-AG-१२६० | -- |
| ४ | १०,००,०००/- | होंन्डा सीटी | MH-०२-FJ-९२९० | MH-०२-FJ-९२९० | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ९,००,०००/- | टोयाटो यारीस | MH-०२-FJ-८५८६ | MH-०२-FJ-८५८६ | -- |
| | **५९,००,०००/-** | **एकुण** | | | |

तरी वरील नमुद गुन्हयाचे पुढील तपास कामी आरोपीस भाईंदर पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास भाईंदर पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे कक्षाचे प्र.पो.निरी/अविराज कुराडे, सपोनिरी/ नितीन बेंद्रे, प्रशांत गांगुर्डे, सहापोउपनिरी/श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, विजय गायकवाड, रविंद्र भालेराव, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, हनुमंत सुर्यवंशी , समीर यादव ,विकास राजपुत, संदिप शेरमाळे, रविंद्र कांबळे, पोअं/नितीन राठोड, सफौ.संतोष चव्हाण, मसुब/सचिन चौधरी यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.




-----ooo-----